**प्रेसनोट दिनांक - २९/०४/२०१९**

**डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**हरवलेली पर्स मिळाली पोलीसांच्या मदतीने परत.**

---

दिनांक २६/०४/२०१९ रोजी मपोना.ढवळे यांना डेक्कन पोलीस स्टेशन येथे ठाणे अंमलदार मदतनीस ड्युटी असतांना डॉ.वैदय यांनी लेडीज हॅन्ड पर्स डेक्कन पोलीस स्टेशन येथे येवुन जमा केली. मपोना.ढवळे यांनी पर्सची पाहणी केली असता त्यामध्ये आधारकार्ड,पॅनकार्ड,कॉलेजचे आयकार्ड, इत्यादी महत्त्वाची कागदपत्र होती. आयकार्ड वरील मोबाईल क्रमांकावर संपर्क करुन त्यांना पर्स विषयी विचारले असता त्या बसने प्रवास करत असतांना त्यांची पर्स गहाळ झाल्याचे सांगितले. कुमारी किरण संजय गायकवाड,आळंदी-देवाची,ता.हवेली,जि.पुणे यांची असल्याचे समजले. दिनांक २८/०४/२०१९ रोजी डेक्कन पोलीस स्टेशन येथे आल्याने आधार कार्ड कॉलेजचे आयकार्ड वरुन सदर पर्स त्यांचीच असल्याची खात्री करुन कागदपत्रासह पर्स परत करण्यात आली. कु.किरण संजय गायकवाड यांना आपली पर्स परत मिळाल्याने त्यांनी पोलीसांचे आभार मानले.

